# यात्रा

## मानक निर्देश पध्दती

Standard Operating procedure
(SOP)

2013

## जिल्हाधिकारी कार्यालय
## परभणी.

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | विषय |
|---|---|
| १. | प्रस्तावना |
| २. | परभणी जिल्ह्यातील यात्रा स्थळे |
| ३. | यात्रेच्या काळातील विविध खात्यांकडून पार पाडावयाच्या जबाबदाऱ्या |
| ४. | परभणी जिल्हा आपत्कालीन परिस्थिती संपर्क करावयाचे दुरध्वनी क्रमांक |

# महाराष्ट्र आपत्ती व्यवस्थापन कार्यक्रम
# जिल्हा–परभणी

## यात्रेच्या काळात मार्गदर्शक सुचना

## प्रमाणित कार्य पध्दती
## (Standard Operating Procedure)

**गृह मंत्रालय, भारत सरकार**

**मदत आणि पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन**

# जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण

## जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी.

दूरध्वनी क्र. ०२५५२-२२३७०२

प्रमाणित कार्य पध्दती

(Standard Operating Procedure)

यात्रेच्या काळातील विविध खात्याकडून पार पाडावयाच्या जबाबदाऱ्या
शासननिर्णय आर.एल.एफ. 2009 प्र.क्र.म-3 मार्च 2009

## प्रस्तावना

**पार्श्वभूमी :**

१. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, (मदत व पुनर्वसन) शासन परिपत्रक क्र. निरनिराळ्या धार्मिकसमाज किंवा इतर सामाजिक प्रयोजनासाठी यात्रा भरतात.मांढरदेव, ता.वाई, जि. सतारा येथे काळुबाई देवीच्यायात्रेत दि. २५/०१/२००५ रोजी झालेल्या चेंगराचेंगरीमध्ये २९३ व्यक्ति मृत झाल्या होत्या. सदरहु घटनाची सखोल चौकशी करण्यासाठी गृह विभागाकडून मा. उच्च न्याया. मा. न्याय. श्री राजन कोचर यांचे अध्यक्षतेखाली चौकशी अयोग नेमण्यात आला होता. आयोगाने राज्यमध्ये यात्रेत अशा प्रकारच्या दूर्घटना होवू नयेम्हणून काही शिफरशी केलेल्या आहेत. हे लक्षात घेवून शासनाने यात्रेंचे नियोजन व अमलबजावणी संदर्भात सर्वसमावेशक सुचना प्रमुख्याने महसूल,पोलीस, उर्जा, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे करिता सुचना निर्गमित केले आहेत.

२. त्याच प्रमाणे महाराष्ट्र शासन, गृह विभाग , शासन परिपत्रक क्र एमआयएस०२०५/प्रक्र.३१/विशा १ (अ) दिनांक ७ मार्च २००५, नुसार मोठ्या संख्याच्या यात्रा सुरळीत पार पाडण्याकरीता करावयाच्या उपाययोजना काणत्या असाव्यात याबबत शासनाने संबंधितांनी आवश्यक ती काळती घेण्याबाबत मार्गदर्शक सुचना प्रसृत केले आहे.

वरिल शासन परिपत्रकात दिलेल्या सुचनेनुसार परभणी जिल्ह्यातील होणाऱ्या यात्रा, सार्वजनिक दिलेल्या सुचनेनुसार परभणी जिल्ह्यातील होणाऱ्या यात्रा, सार्वजनिक उत्सव तसेच धार्मीक समाजिक स्वरूपाचे कार्शक्रम इत्यादी मध्ये होणऱ्या गर्दीमुळे होणारे आपघात टाळण्यासाठी करावयाच्या उपाययोजना करतांना आपत्ती व्यवसथापन आरखडे व प्रमाणित कार्यपध्दती तयार करण्यात येत आहे.

## परभणी जिल्हा

### जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन :

महाराष्ट्र राज्यातील दख्खन पठारावर असलेल्या मराठवाडा विभागातील ८ जिल्ह्यापैकी परभणी एक जिल्हा आहे. हा जिल्हा महाराष्ट्र पुर्वेस वसलेला आहे. जिल्ह्याचे क्षेत्रफळ ६५११ चौ.कि.मी. आहे. जिल्ह्याची समुद्र सपाटीपासून सर्वसाधारण उंची ४५७ मिटर आहे. जिल्ह्यातील खरीप हंगामातील मुख्य पिके ज्वारी, कापुस, मुग असुन रब्बी पिकांमध्ये रब्बी जवार, तुर, गहु, भुईमुग करडी मुख्य पिके आहेत.

जिल्ह्यात एकुण ९ तालुके असुन महजसूल मंडळांची संख्या ४०, तलाठी सज्जाची संख्या २३७, एकुण गांवाची संख्या ८५२ तर ग्रामपंचरायतीची संख्या ७०४ अशी आहे. तालुका पालमत वगळता जिल्ह्यात ८ नगर पालिका अस्तीत्वात आहे. जिल्ह्यातील प्रमुख नद्या गोदावरी नदी, दुधना नदी, पुर्णा नदी अशी आहे तर इंद्रायनी नाला, पिंगळगढ नाला, बोरणा नदी, मासोळी नदी, वाण नदी, करपरा नदी, कसुरा नदी असे इतर नद्या आहेत. जणगणना २००१ प्रमाणे जिल्ह्याची लोकसंख्या १५,२७,७१५ इतकी आहे. तालुकावार माहिति खालील प्रमाणे आहे.

## सर्व साधारण माहिती

| अ.क्र | तालुका | गांव संख्या | सन २०११ चे जनगणनेनुसार एकुण लोकसंख्या | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | पुरूष | स्त्री | एकुण |
| **1** | **2** | **3** | | | |
| 1 | परभणी | 132 | २,७६,६५२ | २,६१,१९२ | ५,३७,८४४ |
| 2 | पुर्णा | 95 | ९४,३५१ | ८८,३९० | १,८२,७४१ |
| 3 | गंगाखेड | 106 | १०,४,८६० | ९७,८१७ | २,०२,६७७ |
| 4 | पालम | 82 | ६,००२८ | ५५,४५० | १,१५,४७८ |
| 5 | सोनपेठ | 60 | ४६,५७४ | ४३,१९९ | ८९,७७३ |
| 6 | सेलु | 95 | ८७,०४५<br>५९,८९७ | ८२,६४६<br>५६,९६२ | १,६९,६९१<br>१,१६,८५९ |
| 7 | मानवत | 54 | ७१,५५१ | ६७,३४७ | १,३८,८९८ |
| 8 | पाथरी | 56 | १,४५,२२७ | १,३६,७९४ | २,८२,०२१ |
| 9 | जिंतुर | 172 | ९,४६,१८५ | ८,८९,७९७ | १८,३५,९८२ |
| | एकुण | **852** | | | |

स्थान व भौगोलिक स्थिती :

भौगोलिक स्थान व सीमा.

महाराष्ट्र राज्याच्या नकाशात परभणी जिल्हा पुर्व भागात आहे. परभणी जिल्ह्याच्या पूर्व दिशेस हिंगोली जिल्हा आहे. उत्तरेस जालना हा जिल्हा आहे.१८.४५ ते २०.०१ अंश उत्तर अक्षांस आणि ७६.१३ ते ७७.२९ रेखांशावररेखांश स्थीत आहे.

भौगोलिक रचना :

परभणी जिल्हा हा १८.४५ ते २०.०१ अंश उत्तर अक्षांश आणि ७६.१३ अंश ते ७७.२९रेखांशावर असलेला आहे. जिल्ह्याचे एकुण क्षेत्रफळ ६५११ चौ. कि.मी. एवढे आहे. परभणी जिल्ह्याची समुद्र सपाटीपासुनची उंची सर्वसाधारणपणे ४५७ मिटर आहे. जिल्ह्याची सर्वात उंच भाग जिलह्याच्या पश्चिम दिशेला असलेल्या अजिंठा पर्वतात असुन त्याची उंची ५९७.७ मिटर एवढी असुन खरीप ज्वारी, कापुस, उडीद आणि तुर तर रब्बी ज्वारी, गहु, हरभरा व करडी ही प्रमुख पिके घेतली जातात.

परभणी जिल्ह्याचे हवामान :

परभणी जिल्ह्याचे हवामान सर्वसाधारणपणे उष्ण व कोरडे आहे. पावसाळ्यात दमट असते. उन्हाळ्यात तापमान जास्त असते ३८.० ते ४२.० डिग्री सेल्सेस तापमान असतो. परभणी जिल्ह्यात पावासचे प्रमाण जास्त नसुन ४ ते ५ वर्षातुन एकदा जास्त पावसाळा होतो. माहे ऑगस्ट व सप्टेंबर मध्ये जास्त पाउस पडतो.

प्रशासकीय विभाग :

परभणी जिल्हा औरंगाबाद महसूल विभागत येत आहे. प्रशासकीय कामाच्या दृष्टीने (२) उप विभाग असून एकुण (९) तालुके आहेत.

| अ.क्र. | उपविभाग | तहसिलचे नांव | | |
|---|---|---|---|---|
| १. | परभणी (५) | परभणी<br>पालम | पुर्णा<br>सोनपेठ | गंगाखेड |
| २. | सेलु (४) | सेलू<br>जिंतूर | मानवत | पाथरी |

| | | | |
|---|---|---|---|
| १. | महानगर पालीका | -. | १ |
| २. | नगर पालीका | - | ७ |
| २. | पंचायत समिती | - | ९ |
| ३. | ग्रामपंचायती | - | ७१३ |

जिल्ह्यातील पर्जन्यमान

विशिष्ट भौगोलिक परिस्थितीमुळे अतिवृष्टीमुळे जिल्ह्यांतील गोदावरी नदीला पावसाळ्यांत ४ ते ५ वर्षातुन एक वेळेस पूर येतो. परभणी जिल्ह्यात जुलै – २००५, ऑगस्ट –२००६ मध्ये अतिवृष्टी होती. २००७ मध्ये ८०६.८ मि.मि. पाउस पडला होतो. अतिवृष्टी व येलदरी, सिध्देश्वर धरणाचे पाणी गोदावरी नदीच्या पात्रात सोडल्यामुळे पूर परिस्थिती निमार्ण झाली होती. जिल्ह्यात सरासरी पर्जन्यमान ७७४.५ मि.मि. पडतो.

जिल्ह्यामध्ये होणाऱ्या यात्रा, सार्वजनिक उत्सव, धार्मीक–सामाजीक स्वरूपाचे कार्यक्रम

परभणी जिल्ह्यामध्ये होणाऱ्या यात्रा, सार्वजनिक उत्सव, धार्मीक–सामाजीक स्वरूपाचे कार्यक्रमाचा तालुका तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र . | तालुका | यात्रा/उत्सवाचे ठिकाण | यात्रा/उत्सवाचे नांव |
|---|---|---|---|
| १. | जिंतूर | पाचेगांव | नवरात्र पाचेगांव यात्रा |
| २. | जिंतूर | अंबिकावाडी | भोगांव देवी यात्रा |
| ३. | जिंतूर | चारठाणा | जनार्दन स्वामी यात्रा |
| ४. | सेलू | देऊळगाव गात | गोरखनाथ यात्रा |
| ५. | सेलू | लाडनांद्रा | आईची यात्रा |
| ६. | सेलू | सेलू | बाबासाहेब यात्रा उर्स |
| ७. | पाथरी | ढालेगांव | मारवाडी समाज यात्रा |
| ८. | पाथरी | गुंज | दत्त यात्रा |
| ९. | पाथरी | पाथ्ररगव्हाण | महादेवाची यात्रा |
| १०. | पाथरी | कासापूरी | महादेवाची यात्रा |
| ११. | पाथरी | नाथरा | देवीची यात्रा |
| १२. | पाथरी | जवळा जुटा | देवीची यात्रा |
| १३. | पाथरी | वरखेड | मारोती यात्रा |
| १४. | पाथरी | गोपेगाव | देवीची यात्रा |
| १५. | पाथरी | चिमुरगव्हाण | दत्त जंयती यात्रा |
| १६. | पूर्णा | गौर | महादेवाची यात्रा |
| १७. | पूर्णा | धनगर टाकळी | गंगाजीबापू यात्रा |
| १८. | पूर्णा | आहेरवाडी | समगीर महाराज यात्रा |

| अ.क्र . | तालुका | यात्रा/उत्सवाचे ठिकाण | यात्रा/उत्सवाचे नांव |
|---|---|---|---|
| १९. | पूर्णा | लक्ष्मीनगर | भवानी मंदीर यात्रा |
| २०. | पूर्णा | आवई | दर्गा यात्रा |
| २१. | पूर्णा | कानडखेड | आईची यात्रा |
| २२. | पूर्णा | एरंडेश्वर | दक्षयनी यात्रा |
| २३. | पूर्णा | पिंपळगाव समि. | पुरबगंगा यात्रा |
| २४. | पूर्णा | पूर्णा | हजरत मस्तान शहावली उर्स |
| २५. | परभणी | लोहगाव | ऋकरबुवा यात्रा |
| २६. | परभणी | नवागड | नवागड यात्रा |
| २७. | परभणी | त्रिधारावाडी | ओंकारेश्वर महाराज यात्रा |
| २८. | परभणी | उमरी माळ्याची | इंद्रायणी यात्रा |
| २९. | परभणी | परभणी | हजरत तुराबुल हक्क उर्स |
| ३०. | परभणी | परभणी | खंडोबा यात्रा |
| ३१. | गंगाखेड | हरंगूळ | राजामृत हरिनाम महाराज यात्रा |
| ३२. | गंगाखेड | गणेशपुरी | गणेशपुरी महाराज यात्रा |
| ३३. | गंगाखेड | नरळद-इरळद | आईमाईची यात्रा |
| ३४. | गंगाखेड | राणीसावरगाव | देवीची यात्रा |
| ३५. | गंगाखेड | गंगाखेड | दसरा महोत्सव रथ यात्रा |
| ३६. | मानवत | कुंभार गंगा किनारा | भोसा इंद्रायणी यात्रा |

**यात्रेसाठी संपर्क अधिकारी नियुक्ती :**

१. नयब तहसिलदार किंवा मंडळ अधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्यांची संपर्क अधिकारी (नोडल ऑफीसर) म्हणुन नियुक्ती संबंधित करण्यात येत आहे.

२. परभणी शहरात उर्ससाठी उपविभागीय अधिकारी यांना संपर्क अधिकारी (नोडल ऑफीसर) म्हणुन करण्यात येत आहे.

३. त्याच प्रमाणे परभणी तालुक्यातील यात्रेसाठी नायब तसहसिलदार यांना संपर्क अधिकारी म्हणुन नियुक्ती संबंधित उपविभागीय अधिकारी यांनी करावी.

वरील अधिकाऱ्यांच्या सुचना व देखरेखीखालील संबंधित क्षेत्रातील शासनाच्या महसूल, उर्जा विभाग, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, सार्वजनिम बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, माहनगर पालीका किंवा नगर परिषद, आरोग्य विभाग, परिवहन विभाग, राज्य उत्पादन शुल्क विभाग इत्यादी सर्व विभागांनी/ कार्यालयांनी कामकाज पहावे व त्यांना देण्यात आलेलेल्या कामकाजाबाबतच्या जबाबदाऱ्या पार पाडव्यात.

# प्रमाणित कार्य पध्दती

## (Standard Operatin Procedure)

यात्रेच्या काळातील विविध खात्याकडून पार पाडावयाच्या जबाबदाऱ्यणा महसूल खाते :

महसूल खाते कोणत्याही यात्रेच्या वेळी उपविभागीय अधिकारी हे जिल्हाधिकारी यांच्या नियंत्रणाखाली समन्वयक अधिकारी (Nodal Officer) म्हणून काम करतील. त्यांनी यात्रेच्यासाठीची सर्व शासकिय विभागकडून व देवस्थानाकडून तयारी करून घ्यावी.

मंदीर टेकडीवर असल्यास पायऱ्यांवर कोणतेही दुकाने ठेवण्यात येऊ नये, येण्याजाण्यासाठी मार्ग मोकळा ठेवावा. मंदिरात जेथे नारळ किंवा तेल, मुर्तीवर टाकण्यात येते आणि त्या भोवती असलेल्या परिसरात तेल पसरून घसरण्याची शक्यता असले अशा परिस्थितीत मंदिर ट्रस्टच्या लोकांकडून नारळ अगर तलि टाकण्यासाठी मुर्तीजवळ एक स्थान निश्चित करावे. तेथे श्रध्दाळूंकडून त्यांचे नारळ व तेल टाकण्यात यावे. कोणत्याही परिसरात घसरण्यासारखा पदार्थ परिसरात किंवा पायरीपवर पसरू नये याकडे जिल्हा प्रशासनाने लक्ष द्यावे.

## ट्रस्ट/देवस्थान व्यवस्थापकीय मंडळ

- ट्रस्ट/व्यवस्थापकीय मंडळ यांनी, जिल्हा प्रशासनास विश्वासात घेवून यात्रेचे नियोजन व अंमलबजावणी करावी. तसेच ट्रस्टमार्फत यात्रेसंबधीचा आपत्ती व्यवस्थापन आरखडा तयार करून तो जिल्हा प्रशासनास सादर करावा.

- ज्या ज्या देवस्थानांच्या ठिकाणी व्यवस्थापकीय मंडळ/देवस्थान ट्रस्ट अस्तित्वात आहेत, त्या त्या देवस्थानांच्या वार्षिक यात्रांचे नियोजन संबंधीत ट्रस्टकडून व त्या ट्रस्टच्या घटनेत नमूद केलेल्या उद्दीष्टानुसारच व्हावे.

- भाविकांच्या गर्दीचा विचार करून त्यांच्या सुलभ आणि सुरक्षित हालचालींसाठी देवस्थान परिसरात पुरेशी जागा उपलब्ध करून घेणे व बॅरेकेडिंग करून घेणे आवश्यक आहे.

- देवस्थान स्वच्छ व निर्मळ ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न रिणे व भाविकांमध्ये तशी शिस्तीची भावना रूजवणे या करिता संबंधीत /व्यवस्थापकीय मंडळ यांनी प्राधान्य द्यावे.

- यात्रेच्या तारखा निश्चित करून त्या ट्रस्ट मार्फत प्रसिध्द कराव्यात.

- भाविकांच्या येण्याजाण्याच्या मार्गावरील अतिक्रमाणे काढून घ्यावीत. यासाठी स्टॉल्स व दुकानांची संख्या मर्यादित करून मार्गातील सर्व प्रमारचे अडथळे दूर करावेत.

- महाद्वार कमानीपासून वर जाणाऱ्या मार्गावरील ठिकठिकाणी तुटलेल्या पायऱ्या दुरूस्त करून घ्याव्यात आणि परतीच्या मार्गावरील सर्व उतार काढून त्या ठिाकणी समान मापाच्या व एकसारख्या उंचीच्या पायऱ्या या किमान महाद्वार पर्यंत तयार करून घ्याव्यात. यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडील तज्ञांनचे मार्गदर्शन घेवून त्यांचे मार्फत ही दुरूस्ती करून घ्यावी. त्यासाठी आवश्यक ती रक्कम सार्वजनिक बांधकाम विभागस द्यावी व हे काम यात्रेपूर्वी किमान १ महिना आगोदर पूर्ण होणे जरूरी आहे.

- मंदिर परिसरात भाविकांच्या रांगा लावण्यासाठी व गाभाऱ्यात दर्शन घेतलेले भाविक बाहेर काढण्यासाठी विविध शैक्षणिक संस्था/संघटना, तारूण मंडळे यांच्या मदतीने, स्वंयसेवक नेमावेत. त्यांच्या राहण्याची भोजणाची व

मानधनाची व्यवस्था पहावी.

- संपूर्ण यात्रा कालावधीत मंदिर परिसर स्वच्छ ठेवावा. विशेषत: भक्तांच्या पायाखाली निसरडे होणार नाही याची दक्षता घ्यावी.

- मंदिर परिसरात गर्दी नियंत्रणासाठी पोलीसांच्या आराखड्यानुसार उभारावे लागणारे अडथळे (बॅरेकेड) लाऊन घ्यावेत.

- बंदोबस्त कर्तव्यावरील पोलीस अधिकारी, कर्मचारी व गृहरक्षक यांच्या निवास व भोजन व्यवस्थेसाठी पुरेशी जागा उपलब्ध करून घ्यावी.

- जिल्हा आरोग्य अधिकारी यांना वैद्यकीय व्यवस्थेसाठी किमान २००० चौ.फु. जागा मंदिर परिसरात उपलब्ध करून देऊन त्यांच्या मागणीप्रमाणे तेथे पेन्डॉल (तंबू) उभारावेत व आवश्यक फर्निचर व सोयी उपलब्ध करून द्याव्यात.

- सेवाभावी वैद्यकीय संस्था व संघटनाशी संपर्क साधून त्यांच्याकडून औषधे, वैद्यकीय साधने इ. मिळविणेसाठी जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे सहकार्य घ्यावे.

- बेकायदेशीर व नियमबाह्य विद्युत जोडणी घेणाऱ्या स्टॉल्स, हॉटेल्स, दुकाने व विक्रेते यांना कायदेशीर व नियमानुसार विद्युत पुरवठा करण्यात आला आहे त्यांची यादी तयार करून ती महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळास सादर करावी. नियमबाह्य वीज वापरास परवानगी देऊ नये.

- यात्रा व मंदिर परिसरात दोन वेगवेगळ्या ठिकाणी किमान दोन अग्नीशामक बंब सुसज्ज ठेवावेत.

- यात्रा परिसरातील व पंचक्रोशातील अवैद्य दारू उत्पादन व विक्री पूर्णपणसे निष्पभ्र करण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागास अशा उत्पादन व विक्री ठिकाणांची माहिती स्थानिक नागरीक व भाविक यांचे कडुन मिळवून सादर करावी.

- उपहारगृहे व खाद्यपदार्थ विक्री केंद्राना परवानगी देतांना त्यांना अन्न व औषध भेसळ विभागाकडील ना हरकत

परवाने अनिवार्य आहे.

**धर्मदाय आयुक्त :**

- पुजा दिक्षणा, ट्रस्ट मिळकत व वहिवाटीच्या हक्कांवरून ज्या देवस्थान ट्रस्टमध्ये वाद व खटले प्रलंबित आहेत, त्वरेन निकाली काढण्यात यावेत. यासाठी धर्मादाय आयुक्तांच्या मार्फत स्वतंत्र लोकन्यायालयाचे आयोजन करण्यात यावे.

- पुजापाठ, दक्षिणा, नवस आदि कारणास्तव भाविकांच्या श्रध्दांचा फायदा घेण्याच्या प्रसंगावर आळा बसण्यासाठी धर्मादाय आयुक्तांनच्या मार्फत यात्रा ठिकाणी तक्रार नोदविण्यासाठी केंद्र उभारण्यात यावीत.

**सुलभ दर्शन व्यवस्था**

- देवांच्या मुर्तीचे निर्मळ दर्शन ही यात्रेत सहभागी होणाऱ्या भाविक–भक्तांच्या दृष्टीने एक अप्रपाची बाब असते परंतु मंदिरातील अपुरी जागा, भाविंकाची प्रचंड गर्दी, विशिष्ट लोकांसाठी ट्रस्ट व पुजाऱ्यांकडून भाविकांच्या ताटकळणाऱ्या रांगा मोडून केली जाणारी दर्शन व्यवस्था, यामुळे वेळ खर्च करून शिस्त पालन करणाऱ्या संयमी भाविकांचा ताले सुटून अनर्थ ओढावण्याची शक्यता नाकरता येत नाही. याबाबतीत विश्वस्त मंडळींनी काटेकोर राहणे अत्यावश्यक आहे.

  भाविकांच्या दर्शन रांगा लावण्यासाठी ओळख चिन्हे किंवा विशिष्ट गणवेशातील धार्मिक वृत्तीच्या स्वयंसेवकाची मदत घेण्यात यावी.

**विशिष्ट प्रथांना बंदी :**

- यात्रांच्या नियोजनानुसार अंमलबजावणी करण्यात कार्यकारी यंत्रणांना काही ठिकाणी विशिष्ट प्रथांचे अडथळे निर्माण होत असतात. हे दूर करण्यासाठी भाविकांचे मत परिवर्तनाची नितांत गरज आहे. म्हणून अशा समान्यत: अनिष्ट मानल्या गेलेल्या प्रथांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी अंधश्रध्दा निर्मुलनाशी संबंधित कायदे व नियमांच्या परिणामकारक अंमलबजावणीत जिल्हा प्रशासनाने/ट्रस्ट व्यवस्थापकीय मंडळाने लक्ष पुरविणे अत्यावश्यक आहे. प्रचंड व बेशिस्त गर्दीला दुर्घटनेच्या सीमेवरून परत आणण्यासाठी स्थानिकांच्या दर्शन मार्गात नैवेद्य ठेवणे, अरूंद गाभाऱ्यात निसरड्या पदार्थाचा अभिषेक चढविणे इत्यादि प्रथांवर नियंत्रण आणण्यासाठी व त्यामुळे होणारे संभाव्य धोके टाळण्यासाठी गर्दीचा विचार करून त्याकरिता स्वतंत्र जागा निश्चीत करण्यात याव्यात. या विषयाचे भाविकांचे

सतत प्रबोधन होणे देखिल अत्यावश्यक आहे.

## बेशिस्त भाविकांवर नियंत्रण

- यात्रेतील भाविकांची वाढती गर्दी, वाहनांचा बेसुमार वापर, सहलींच्या भावनेने लोकांचा यात्रेतील सहभाग, दर्शनसाठी रांगा मोडुन पर्यायी वाटेने दर्शन मिळविण्याची मानसिकता, काही यात्रांमध्ये होणारी पशुहत्या, सामुहिक व्यक्तीमत्वाने कायदा व शिस्त मोडण्याची प्रवृत्ती, अशा सध्यास्थितीतील बेशिस्त भाविकांवर नियंत्रण करणे यात्रेकरू, समाज व शासन यंत्रणेच्या दृष्टीने आत्यवश्यक बाब आहे. याची पूर्तता समाजातूनच निर्माण झालेल्या समाजिक संस्था प्रबोधनाच्या मार्गाने प्रभावी फलद्रुप करू शकतात.

## मुलभूत सोयी सुविधांची उपलब्धी

कोणत्याही यात्रेसाठी भाविकांना पुढील सोयीसुविधा उपलब्ध व्हाव्यात.

१) जाण्या येण्याचे दोन स्वतंत्र मार्ग

२) हालचालीसाठी पुरेसा विस्तुत परिसर.

३) पिण्याच्या पाण्याची व्यवस्था

४) परिसर स्वच्छता

५) पुरेशा संख्येने स्वच्छता गृहे व निवास व्यवस्था

६) मंदिर, गाभारा व परिसरातील दुकांनाच्या रोषणाईच्या सुरक्षित विद्युत जोडण्या व त्यांची वेळोवेळी तपासणी

७) सुसज्ज ध्वनीक्षेपण यंत्रणा

८) धोक्याची सूचना देणारी यंत्रणा

९) सुरक्षित वाहन पार्कींग व्यवस्था व जागा

१०) संवेदनशील ठिकाणी क्लोज सर्कीट टि.व्ही. यंत्रणा

११) मुख दर्शन किंवा फोटो दर्शनांची व्यवस्था

१२) पुरेशी वैद्यकीय व अग्नीशमन सेवा

१३) भाविकांच्या रांगा लावण्यासाठी पुरेशा संख्यने गणवेशातील ओळखू येतील असे स्वयंसेवक

१४) यात्रेकरूंच्या शंका निरसानासाठी व तक्रारनिवारण्यासाठी सोयीच्या ठिकाणी नियंत्रण कक्ष वगैरे

**नगरपालिका**

- बहुतेक मंदिरे शहर व गावांच्या मध्यवर्ती ठिकाणी किंवा दुर्गम डोंगरावर स्थापित असल्याने यात्राकालावधीत अशा शहरे व गावांचे नगारी जीवनमान, वाहतुक व्यवस्था यात ती विस्क्हीतपनणा निर्माण करताना दिसतात. अशा ठिकाणी मंदिरांच्या असपासचा भाग हा अतिशय गर्दीचा, अरूंद रस्त्यांचा आहे. मंदिर परिसर व यात्रा परिसर यात भाविकांच्या हालचाली, मदत पथके व मदत सामुग्रीच्या हालचाली सुकर होण्यासाठी तेथील परिसर हा प्रशस्त व मोकळा करणे अत्यंत आवश्यक आहे. नगरपालिका परिसरात ट्रस्टच्या मालकीची जागा नसणाऱ्या ठिकाणी परिसर मोकळा ठेवण्याची जबाबदारी महानगरपालिका व नगरपालिका यांची असेल.

**ग्रमा पंचायत**

- गावपातळीवर छोट्या स्वरूपाच्या व ग्रामदैवतांच्या यात्रांचे व्यवस्थापन व नियोजन ग्राम पंचायत यात्रा कमिटीमार्फत व्हावे.

- केवळ उत्पन्न वाढविण्याच्या उद्येशाने भाविकांच्या कर लादण्यात येऊ नये.

- योत्रेतील दुकांनाना परवानगी देतांना रस्त्यांच्या क्षमतेचा व भाविकांच्या संख्येचा एकत्रित विचार करून भाविकांची सुरक्षितता जपली जाईल असे पहावे.

- पाणी, स्वच्छतागृह, निवास व्यवस्था या बाबींचे नियोजन करतांना भाविकांची संख्या विचारात घेण्यात यावी.

**जिल्हापरिषद :**

- भाविकांसाठी किमान तीन ठिकाणी स्थायी वैद्यकीय सुविधा पुरवाव्यात व एक वैद्यकीय पथक फिरते ठेवावे. यासाठी जरूरी असल्यास सेवाभावी वैद्यकीय संस्थांची मदत घेवून त्यांच्याकडून डॉक्टर्स, नर्सेस, औषधे, वैद्यकीय साधने इ. उपलब्ध करून घ्यावेत.

- पुरेशा प्रमाणात प्राणवायु, जीवरक्षक औषधे व सुविधा असलेल्या रूग्णवाहिका वैद्यकीय पथकांकडुन सुसज्ज ठेवाव्यात.

- यात्रेत नेमण्यात येणाऱ्या वैदकीय पथकांसह प्राथमिक आरोग्य केंद्र ग्रामीण रूग्णालयात तज्ञ डॉक्टर्स व अनुभवी स्टाफ नेमण्यात यावा.

- साथीच्या रोगाबाबत प्रतिबंधक लसीकरण करावे.

- मंदिर व यात्रा येथे भाविकांना पाण्याची कमतरता पडू नये म्हणून तात्पुरता नलीका पाणीपुरवठा करावा. भाविकांसाठी गर्दी एकवटणार नाही अशा अंदाजाने ठिकठिकाणी पाण्याचे नळ पुरवावेत.

- भाविकांसाठी तात्पुरती चरीची शौचालये व फिरते सुलभ शौचालये पुरेशा संख्येने उपलब्ध करून द्यावीत.

**पोलीस प्रशासन :**

- कायदा व सुव्यवस्था सांभाळणे, यात्रा काळात घडणाऱ्या गुन्ह्यांना प्रतिबंध घालणे, वाहतुक नियंत्रण सांभाळणे, या कामांना प्राधान्याने घ्यावे.

- भक्तांच्या रांगा लावण्याचे काम व्यवस्थापकीय ट्रस्टकडून उपलब्ध झालेल्या स्वयंसेकांच्या मदतीने करून घ्यावे.

- वाहतूक नियंत्रण व नियमन हा कोणत्याही यात्रेतील महत्वाचा घटक आहे. पोलस विभागने यात्रा कालावधीसाठी अधिसूचना काढून प्रचलित वाहतूक मार्गात जरूरीप्रमाणे बदल करून घ्यावेत, वाहने पार्किंग मर्यादा निश्चित करावी व तशी पुरेशी जाहिर प्रसिध्दी द्यावी.
- यात्रेतील संभाव्य कायदा व सुव्यवस्था, गुन्हे नियंत्रण आणि सुरक्षिततेचा अभ्यास करून पोलीस कर्मचारी व गृहरक्षक असे आवश्यक कर्मचारी बंदोबस्तासाठी नेमावेत. त्यात अधिकारी व जरूरीप्रमाणे महिला कर्मचारी नियुक्त करावेत.

- बंदोबस्तासाठी नेमलेले सर्व अधिकारी व कर्मचारी यांना त्यांचे ड्युटीचे ठिकाणी आणि त्यांनी करावयाच्या कर्तव्याची माहिती करून देऊन काही कारणाने आणिबाणीची परिस्थिती निर्माण झाल्यास प्रत्येक अधिकारी व कर्मचारी यांची काय भूमिका असावी व त्यातील प्रत्येकाने त्यावेळी काय कर्तव्य पार पाडावे, याबाबत सर्वांना पुरेसे व सखोल मार्गदर्शन करावे.

- मंदिर परिसरातील गर्दीचा अभ्यास करून गर्दी नियंत्रणासाठी उभारावे लागणारे अडथळे कशा पध्दतीने उभारावेत याबबतचा अराखडा तयार करून तो अध्यक्ष, देवस्थान ट्रस्ट यांना पुरवावा.

- पोलीस अधिकाऱ्यांनी, उपविभागीय अधिकारी यांचे सोबत यात्रास्थळांस भेट देऊन पोलीसांच्या निवास व भोजन व्यवस्थेसाठी देवस्थान ट्रस्टकडून जागा उपलब्ध करून घ्याव्यात. देवस्थान ट्रस्टकडून नेमण्यात आलेल्या स्वयंसेवकांना त्यांचे कर्तव्याचे ठिकाण नेमून द्यावे आणि काही कारणाने आणिबाणीची परिस्थिती निर्माण झाल्यास त्यावेळी त्यांची काय भूमिका असावी व त्यातील प्रत्येकाने काय कर्तव्य पार पाडावे याबाबत सर्वांना सखोल मार्गदर्शन करवे व प्रशिक्षण द्यावे.

- पोलीस विभाग त्यांचे विशेष शाखेकडील अधिकारी व कर्मचाऱ्याकडून तसेच घातपातविरोधी पथकाकडून देवस्थान परिसर, मंदिर व मिरवणूकीचा मार्ग तपासणी करून घ्यावा.

- मिरणुक दरम्यान तसेच भाविकांचे दर्शनाचे रांगेत, स्नानचे ठिकाण, बस स्टँड इत्यादी ठिकाणी समाजविघातक कृत्य करणारे, पाकिटमारी करणारे इसमांवर ठेवणेकामी स्थानिक गुन्हे शाखेकडील कर्मचाऱ्यांची नेमणूक करावी.

- नो पर्कींग झोन घोषीत करण्यासाठी अधिसुचना जाहीर करावी.

- महत्वाच्या ठिकाणी पोलीस चौक्या उभारून त्यात बिनतारी संच, रोप बॅटरी व राखीव स्टाफ नेमावा.
- व्हीडीओ ग्राफर यांना गर्दीतील हालचालींचे चित्रीकरणे करण्यासाठी नेमण्यात यावे.

- ध्वनीक्षापणाद्वारे भाविकांना सुचना देणे.

- काही अनुचित प्रकार घडण्याची शक्यता विचारात घेवून त्यावेळी करावयाच्या कार्यवाहीसाठी आपत्कालीनयोजना तयार करण्यात यावा व सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना ह्या प्रमाण अवगत करून त्यांची रंगील तालीम घेण्यात यावी.

- मंदिरात प्रवेश करण्याच्या ठिकाणी बिनतारी संदेश विभागाकडून धातुशोधकाद्वारे राविण्या यावे.

- मंदिरात प्रवेश घेण्यासाठी व बाहेर पडण्यासाठी दोन वेगवेगळे मार्ग करावेत.

- गर्दीच्या मार्गावर मनोरा उभारून तेथून दुर्बिणीद्वारे गर्दीतील हालचालींवर लक्ष ठेवण्यात यावे व तसा अनुचित प्रकार आढळल्यास पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांशी संपर्क साधुन तात्काळ कार्यवाही करावी.

- यात्रेत घडणाऱ्या घडामोडी बाबत वेळोवेळी माहिती पोलीस ठाण्यात देण्यात यावी व पोलीस ठाणे अमलदार यांनी नियंत्रण कक्षास कळवावी.

- जर अपघात झाला तर कायदा व सुव्यवस्था परिस्थिती निमार्ण होवून चेंगराचेंगरी होवू शक्ते म्हणून गर्दीत कोणीही चारचाकी, दुचाकी वाहने नेणार नाही याची दक्षता घ्यावी,

- पोलीस विभागाने यात्रेदरम्यान महाराष्ट्र राज्य विद्यूत मंडळ, सार्वजनिक बांधकाम विभाग, देवस्थान ट्रस्ट, राज्य परिवहन महामंडळ, प्रादेशिक मोटार परिवहन महामंडळ, ग्रामपंचायत, नगरपालीका सदस्या तसेच नागरिक तसेच हिजल्ह्यातील गृहरक्षक दल, स्वेच्छेने काम करणाऱ्या अशासकीय संस्था यांच्याशी समन्वय ठेवावा, त्यांचेबरोबर वेळोवेळी वैठका घेण्यात याव्यात.

- यात्रे दरम्यान अवैध धंदे चालणार नाही याची दक्षता घ्यावी व आढळून आल्यास त्यांचेवर तात्काळ कार्यवाही करावी.
- मंदिर दर्शनमार्ग, परिसर हा बी.डी.डी.एस. कडून तपासणी करून घ्यावी.

- मंदिर परिसराचे आसपास कोणत्याही प्रकारे दारूकाम (फटाके) किंवा आतषबाजी होणार नाही याची दक्षता घ्यावी.

पोलीस विभाग, प्रशासन व ट्रस्टने यात्रेचे नियोजन करतांना वरील सुचनेचे पालन करावे. यात्रेचा व्यवस्थापन आराखडा संबंधित पोलीस अधिकारी, उपविभागीय अधिकारी व तहसिलदार यांनी तयार करावा. तसेच स्थानकि परिस्थिती लक्षात घेता प्रत्येक विभागसाठी प्रमाणित कार्यपध्दती (ड्जझ) सुचीत करावी. तालुका स्तरावर या प्रमाणित कार्यपध्दतीस उप विभागीय अधिकारी यांनी मान्यता द्यावी.

**परिवहन विभाग** (RTO)

- यात्रा काळात कोणत्याही प्रकारे अवैध प्रवाशी वाहतूक होऊ देऊ नये.

- यात्रा काळात गर्दीचा अंदाज घेवून येणाऱ्या वाहनांचा प्रवाह मर्यादित व नियंत्रित ठेवण्यासाठी जिल्हा सरहध्दीवर तपासणी नाके उभारवेत. प्रस्तावित कारवाई व नियोजनाबाबत पुरेशी प्रसिध्दी द्यावी.

**एस.टी. महामंडळ :**

- भाविकांच्या गर्दीचा अंदाज घेऊन गरजेनुसार पुरेशा संख्येने एस.टी. बसेस उपलब्ध ठेवाव्यात.

- सर्व चालक व वाहक यांना, त्यांनी भाविकांशी सौजन्याने वागण्याच्या आणिबाणीच्या परिस्थितीत करावयाच्या कर्तव्या बाबत आगाऊ मार्गदर्शन करावे.

**स्वंयसेवी संस्थांचासहभाग :**

- सर्व साधारणपणे जानेवारी ते एप्रिल महिन्याच्या कालावधी दरम्यान राज्यातील बहुतांश जिल्ह्यात मोठ्या यात्रा एकाचवेळी किंवा एका पाठोपाठ येतात. प्रशासकीय यंत्रणा, खासकरून महसूल व पोलीस दल या कालावधीत यात्रा बंदोबस्तांनत गुंतून पडतात. पोलीस व प्रशासकीय घटक प्रमुखांना इच्छा असूनही त्यांच्या अपेक्षेप्रमाणे आवश्यक तेवढे मनुष्याबळ उपलब्ध होत नाही. त्यामुळे उपलब्ध मनुष्य बळावर ताण येतो. संबंधित ट्रस्टने पोलीसांच्याऊ/प्रशासकीय यंत्रणेच्या मदतीसाठी स्थानिक स्वयंसेवी संस्था, माजी सैनिक, गृहरक्षक अशा स्वरूपातील सेवा उपलब्ध करून घ्याव्यात.

**विद्युत मंडळ :**

- नोटीफाईड यात्रांसाठी देवस्थानांना लगाणारी वीज, वीजेच्या जादा जोडण्या व वीजेसंबंधी सर्व कार्यवाही यात्रा काळापुरती महाराष्ट्र विद्युत मंडळानेंच स्वत:च्या अधिकारांत व जबाबदारीवर करावी. यासाठी लागणार खर्च ट्रस्टकडुन वसुल करण्यात यावा. जिल्हाप्रशासन व ट्रस्टने यात्रेचे नियोजन करतांना वरील सूचनेचे पालन करावे. यात्रेचा व्यवस्थापन आराखडा तयार करावा. तसेच स्थानिक परिस्थिती लक्षात घेता प्रत्येक विभागसाठी प्रमाणित कार्यपध्दती सूचित करावी. तालुका स्तरावर या प्रमाणित कार्यपध्दतीस उप विभागीय अधिकारी यांनी मान्यता द्यावी आणि जिल्हा पातळीवर होणाऱ्या अशा यांत्रासाठी जिल्हाधिकारी यांनी ही प्रमाणति कार्यपध्दती सूचित करावी. तसेच दर तीन महीन्यातून एकदा संबंधित आयुक्तांनी, अशा स्वरूपाच्या मोठ्या यात्रेबद्दल जिल्हाधिकारी यांनी तयार केलेल्या व्यवस्थापन अराखड्याची माहिती घ्यावी व वेळोवेळी त्यांना आवश्यक त्या प्रमाणे मार्गदर्शन करावे आणि परिस्थितीवर नियंत्रण ठेवावे.

- बेकायदेशीर तसेच नियमबाहय विद्युत वापर आणि असुरक्षित जोडण्या शोधण्यासाठी स्वतंत्र पथके तयार करून अशा जोड्याचा शोध घेऊन त्याबाबत आधीपासून कायदेशीर कारवाई करावी व अशा जोडण्या बंद कराव्यात.

- विद्युत पुरवठा खंडीत होणे हे घातपाताचे कारण होऊ शकते, म्हणून याबाबत सदैव सतर्क रहून अखंडित वीज पुरवावी.

# अधिकाऱ्यांची कर्तव्य व जबाबदाऱ्या

**सर्वसाधारण सुचना**

१. मंदिर परिसर प्रशस्त व मोकळा करण्यात यावा. मंदिरा भोवती असलेली जमीन शासकीय मालकीची आसल्यास परिसर प्रशस्त व मोकळा ठेवण्यासाठी संबंधित तहसिलदार व उपविभागीय अधिकारी यांनी आवश्यम उपाययोजना कराव्यात.

२. भाविकांसाठी दर्शन करण्यासाठी दोन स्वतंत्र मार्ग (जाण्या व येण्यासाठी) ठेवण्यात यावेत. भाविकांच्या मार्गातील अतिक्रमण काढून टाकावीत.

३. आपत्कालीनल परिस्थिती उदभवल्यास, उपलब्ध मंजुर अर्थसंकल्पिय खर्च भागविण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावा.

४. संबंधित तहसिलदार यांनी त्यांचे कार्यक्षेत्रात येणारे यात्रा व इतर धार्मिक उत्सव व यात्रांचे नियोजन करतांना आपत्ती व्यवस्थापन आराखडा (ड्जझ) प्रमाणित कार्य पध्दती, तालुकास्तरावर व उपविभागागीयस्तरावर तयार करूण जिल्हाधिकारी यांचे कडून प्रमाणित करून घ्यावा. (ड्जझ) प्रमाणित कार्य पध्दती तयार करतांना संबंधित विभागांच्या सर्व अधिकाऱ्यांची कर्तव्य व जबाबदारी निश्चित करण्यात यावी.

**ग्रमा पंचायत :**

१. गाव पातळीवर छोट्या स्वरूपाच्या व ग्रमादैवतांच्या यात्रांचे व्यवस्थापन व नियोजन ग्राम पंचायत यात्रा कमिटीमार्फत व्हावे.

२. केवळ उत्पन्न वाढविण्याच्या उद्देशाने भाविकांवर कर लादण्यात येवू नये.

३. यात्रेतील दुकांनाना परवानगी देतांना रस्त्यांच्या क्षमतेचा व भाविकांच्या संख्येचा एकत्रित विचार करून भाविकांची सुरक्षितता जपली जाईल असे पहावे.,

४. पाणी, स्वच्छतागृह, निवास व्यवस्था या बाबींचे नियोजन करतांना भाविकांची संख्या विचारात घेण्यात यावी.

**मंदिर परिसरातील भौगोलिक परिस्थितीत सुधारणा**

१. काही मंदिरे शहर व गावांच्या मध्यवर्ती ठिकाणी किंवा दुर्गम डोंगरवर स्थापित असल्याने यात्राकालावधीत अशा शहरे व गावांचे नागरी जीवनमान, वाहतुक व्यवस्था यात ती विस्कळीतपणा निमार्ण करतांना दिसतात. काही ठिकाणी मंदिराच्या आसपासचा भाग हा अतिशय गर्दीचा, अरूंद रस्त्यांचा असतात. मंदिर परिसर व यात्रा परिसर यात भाविकांच्या हालचाली, मदत पथके व मदत सामुग्रीच्या हालचाली सुकर होण्यासाठी तेथील परिसर हा प्रशस्त व मोकळा करणे अत्यंत आवश्यक आहे. काही ठिकाणी मंदिरांच्या भौगोलिक परिसरावर ट्रस्टची मालकी असल्याने हि जबाबदारी ट्रस्ट/व्यवस्थापकीय मंडळ यांचेवर राहील.

**विशिष्ट प्रथांनरा बंदी :**

२. यात्रांच्या नियोजनानुसार अंमलबजावणी करण्यात कार्यकारी यंत्रणांना काही ठिकाणी अडथळे निमार्ण होत असतात. हे दूर करण्यासाठी भाविकांचे मत गेलेल्या प्रथांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी अंधश्रध्दा निर्मुलनाशी संबंधित कायदे व नियमांच्या परिणामकारक अंमलबजावणीत जिल्हा प्रशासनाने/ट्रस्ट व्यवस्थापकीय मंडळाने लक्ष पुरविणे अत्यावश्यम आहे. प्रचंड व बेशिस्त गर्दीला दुर्घटनेच्या सीमेवरून परत आणण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधीची मदत घ्यावी. नारळ व खोबरे फेकणे, भाविकांच्या दर्शन मार्गात नंवेद्य ठेवणे, अरुंद गाभाऱ्यात निसरड्या पदार्थाचा अभिषेक चढविणे इत्यादी प्रथांवर नियंत्रण आणण्यासाठी व त्यामुळे होणारे संभाव्य धोके टाळण्यासाठी गर्दीचा विचार करून त्याकरिता स्वतंत्र जागा निश्चित करण्यात याव्यात. या विषयी भाविकांचे सतत प्रबोधन करण्याचे कार्य संबंधित ट्रस्ट यांनी करावे.

**मुलभूत सोयी सुविधांची उपलब्धी**

३. कोणत्याही यात्रेसाठी भाविकांना पुढील मुलभूत सोयीसुविधा उपलब्ध व्हाव्यात.

१. जाण्या येण्यासाठी दोन स्वतंत्र मार्ग असावे.

२. हालचालसाठी दोन विस्तृत परिसर असावे.

३. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था असावी व परिसर स्वच्छ असावे.

४. पुरेशा संख्येने स्वच्छता गृहे व निवास व्यवस्था असावे.

५. मंदिर, गाभारा व परिसरातील दुकांनाच्या रोषणाईच्या सुरक्षित विद्युत जोडण्या व त्यांची वेळोवेळी तपासणी करावी.

६. सुसज्ज ध्वनीक्षेपण यंत्राणा आणि धोक्याची सुचना देणारी यंत्रणा असावी.

७. सुरक्षित वाहन पार्कींग व्यवस्था व जागा उपलब्ध करावी.

८. संवेदनशील ठिकाणी क्लोज सर्कीट टि.व्ही. यंत्रणाची व्यवस्था करावी.

९. मुख दर्शन किंवा फोटो दर्शनांची व्यवस्था करावी.

१०. पुरेशा वैद्यकीय व अग्नीशमन सेवा उपलब्ध करावी.

११. भाविकांच्या रांगा लावण्यासाठी पुरेशा संख्येने गणवेशातील ओळख येतील असे स्वयंसेवक उपलब्ध करून द्यावे.

१२. यात्रेकरूनंच्या शंका निरसनासाठी व तक्रारनिवारणासाठी सोयीच्या ठिकाणी नियंत्रण कक्ष स्थापन करावे.

## तालुका पातळीवरील अधिकाऱ्यांसाठी आपत्कालीन मार्गदर्शक सूचना

**आपत्ती पूर्व नियोजन**

१. तालुकास्तरीय अधिकारी यांच्याशी सल्लामसलत करून एकत्रित तालुका आपत्ती व्यवस्थापन योजना तयार करावी. अशी योजना करतेवेळी खालील नमूद बाबींचा अंतर्भाव करावा.

२. तालुक्यामधील आपत्कालीन प्रदेशाचा नकाशा, तालुक्याचा इतिहास, भौगोलिक परिस्थिती, व्यावसायिक तपशिल, यात्रा, धार्मीक महोत्सव इत्यादी बाबत तपशिल. सुरक्षित पर्यायी व्यवस्था (आपत्ती व्यवस्थापन योजना राबविण्यासाठी)

३. कार्यालयाचे कार्यालय प्रमुख, कार्यालयीन कर्मचारी वर्ग, कार्यालयीन वाहन, कार्यालयीन इमारती उपलब्धता.

४. यात्रा, धार्मीक महोत्सव काळात नियंत्रण कक्षामधील तपशीलवार व्यवस्था.

५. भौगोलिक विभाग, प्रादेशिक अधिकारी कार्यालय आणि तहसील कार्यालय, आपत्ती व्यवस्थापन कार्यालय, इतर तालुका स्तरीय अधिकारी कर्मचाऱ्यांनी नेमून दिलेले काम वेळेत व तत्परतेने करणे.

६. तालुक्यामधील संकटकालीन मार्गातून सुटका करण्यासाठी वाहने आणि इतर साहित्यसंबधी विस्ताराने माहिती.

७. तालुक्यातील एका गावातून दुसऱ्या गावी संदेश पाठविण्यासाठी असणारी साधनाची तपशीलवार नोंद.

८. तालुका आपत्ती व्यवस्थापन मंडळाचे कामकाज चालविण्यासाठी विस्ताराने पशिलवार माहिती.

९. एन.जी.ओ. आणि त्यांचे मदतनीस त्यांचे पत्ते आणि तालुक्यातील त्यांचे दुरध्वनी क्रमांक.

१०. आपत्तींची शक्यता असलेल्या ाीगचा पुनर्विचार भय/जोखीम, प्रतिबंधक उपाय, तरणोपाय, तरणोपायाची उपयुक्तता आणि जरूर त्या गोष्टीचा पुरवठा.

११. यात्रा, सन, धार्मीक महत्सव याचा आपत्ती व्यवस्थापन आराखडा व तालुका आपत्ती व्यवस्थापन आराखडा यांचे अद्यायवतीकारण कारणे.

१२. गावच्या भेटीदरम्यान ग्राम आपत्कालीन योजनेअंतर्गत प्रत्येक गावात सुरक्षित निवाऱ्याच्या इमारती/जागांचे निरीक्षण करणे आणि गरज भासल्यास त्यात स्थानिक अधिकारी, उपलब्ध आर्थिक तरतूर आणि स्वंयसेवी संस्था यांच्या मार्फत दुरूस्ती करणे.

**धोक्याची किंवा आपत्तीची सुचना मिळताच :**

१. तालुका आपत्ती व्यवस्थापन प्रमुख (उपजिल्हाधिकारी किंवा तहसीलदार) यांनी भरविलेल्या बैठकित धोक्याच्या परिस्थिती विषयी सचेतन करणे. आपत्कालीन परिस्थितीत कोणत्या अधिकाऱ्याने कोणते काम करावयाचे याची योजना तयार करणे. विविध विभागाच्या अधिकाऱ्याचा गट तयार करणे.

२. आपत्तीच्या शक्यतेविषयी तो कृतीदलाला सचेतन व कार्यशील बनवेल व आपत्तीची सुचना, वेळेवर पोहचवण्यासाठी दळणवळण विषयी सचेतन करेल आणि आपत्कील कृती दलाचे सदस्य सरपंच, तलाठी, मुख्याध्यापक यांना ताबडतोब आणि वेळेत सूनचा देण्याविषयी तत्पर राहणे.

३. तालुका पातळीवरील सर्व कर्मचाऱ्यांना आपल्या मुख्यालयात राहण्याविषयीवचे आदेश देणे.

४. गांव पातळीवरील सर्व कर्मचाऱ्यांना त्यांच्या–त्यांच्या मुख्यालयाच्या जागेवर राहण्याच्या सूचना देणे.

५. अतिसंवेदनशील क्षेत्रामध्ये सूचना देण्यासाठी लाऊड स्पीकर असलेली वाहने पाठविणे.

६. त्याद्वारे कुटूंबाना आपत्तीचा धोका संभवणाऱ्या कुंटूबांना सुरक्षित स्थळी स्थलांतरित करणे.

७. शोध, सूटकाकार्य, स्थालांतर आणि मदत कार्यासाठी त्यांच्या त्यांच्या तालुका आपत्ती व्यवस्पिन आराखडा किंवा गांव आपत्ती व्यवस्थापन आराखडा नूसार योग्य मोजणी मार्गावरून आपत्तीग्रस्त भागात पाठवणे.

८. पूर्वसूचना दिल्या गेल्यामुळे ज्या लोकांना सुरक्षित ठिकाणी हलविण्यासाठी वाहनांची उपलब्धता करून देणे. तात्पुरत्या निवाऱ्याची सोय करणे.

९. आवश्यकतेनुसार तो लोकांना सुरक्षित ठिकाणी हलविण्यासाठी वाहनांची उपलब्धता करून देणे. तात्पुरत्या निवाऱ्यामध्ये आणि रिलीफ कॅम्पमध्ये स्थानिक NGO डॉक्टर आणि औद्योगिक वसहातीच्या मदतीने अन्नपाणी व

